DAY — **05** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | II | 15 | 1100 | J-279 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# ORGANISATION OF COMMERCE AND MANAGEMENT (51)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.*

*(३) डाव्या बाजूस दिलेले अंक प्रश्नांचे क्रमांक दर्शवितात.*

*(४) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराची सुरुवात नवीन पानावर करावी.*

**प्र.१.** **(अ)** रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा : (५) **[२०]**

(१) शास्त्रीय व्यवस्थापनाचे जनक म्हणून ________ यांना ओळखले जाते.

(अ) हेन्री फेयॉल

(ब) एफ. डब्ल्यू. टेलर

(क) फिलिप कोटलर

(२) ________ समय उपयोगिता निर्माण करते.

(अ) गोदाम

(ब) वाहतूक

(क) संदेशवहन

(३) व्यावसायिक हे समाजाचे ________ असतात.

(अ) प्रतिनिधी

(ब) सदस्य

(क) विश्वस्त

(४) विपणी या संज्ञेची उत्पत्ती ________ भाषेतील 'मार्केट्स' या शब्दापासून आलेली आहे.

(अ) फ्रेंच

(ब) लॅटिन

(क) इटालीयन

(५) नुकसान भरपाईचे तत्त्व ________ विम्यास लागू होत नाही.

(अ) जीवन

(ब) सागरी

(क) अग्नी

**(ब)** खालील विधानासाठी शब्द, शब्द समूह किंवा संज्ञा सुचवा **:** (५)

(१) योग्य व्यक्तीची योग्य वेतनासह योग्य त्या जागेवर नेमणूक करणे.

(२) ऑनलाईन व्यवहारातील पहिली पायरी.

(३) नफ्याने प्रेरित होऊन केली जाणारी कृती.

(४) वस्तू किंवा सेवेचा उपभोग घेणारा.

(५) एखाद्या उत्पादनाला विशिष्ट नाव देणे.

**(क)** खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) व्यवस्थापनाचे प्रत्येक कार्य नियोजनावर आधारित नसते.

(२) इ-व्यवसाय जागतिक स्तरावर कोणत्याही क्षेत्रात काम करण्याची मुभा देते.

(३) व्यवसाय नीतिशास्त्र ही नियमावली आहे.

(४) ग्राहक संरक्षण कायदा उत्पादकास संरक्षण देतो.

(५) हवाई वाहतूक हे सर्वात स्वस्त वाहतुकीचे साधन आहे.

**(ड)** गटात न बसणारा शब्द शोधा : (५)

(१) जिल्हा आयोग, राज्य आयोग, अशासकीय संस्था, राष्ट्रीय आयोग

(२) नाबार्ड, आर.बी.आय., सिडबी, एक्झिम

(३) डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, आधार कार्ड, ए.टी.एम. कार्ड

(४) लेखन, नियोजन, संघटन, कर्मचारी व्यवस्थापन

(५) किंमत, व्यक्ती, विक्रय वृद्धी, उत्पादन

**प्र.२. खालील संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा ( कोणत्याही चार ) :** **[ ८ ]**

(१) हालचाल अभ्यास

(२) नियंत्रण

(३) करदेय गोदामे

(४) ग्राहक संरक्षण

(५) ई–मेल

(६) समन्वय

**प्र.३. खालील घटना किंवा परिस्थितीचा अभ्यास करून आपले मत लिहा ( कोणतेही दोन ) :** **[ ६ ]**

(१) श्री शरद हे व्यावसायिक आहेत. त्यांचे पुणे आणि नाशिक येथे कारखाने आहेत. श्री शरद हे कुटुंबासह पुण्यामध्ये स्थायिक असून त्यांना ५ आणि ८ वर्षे वयाच्या दोन मुली आहेत.

(अ) श्री शरद हे त्यांच्या पत्नी व दोन मुलींसाठी जीवन विमा घेऊ शकतात का?

(ब) श्री शरद हे सागरी विमा त्यांच्या कारखान्यासाठी घेऊ शकतात का?

(क) आगीमुळे कारखान्याच्या होणाऱ्या नुकसानीच्या भरपाईसाठी कोणत्या प्रकारचा विमा श्री शरद घेऊ शकतात?

(२) श्री सुरेश यांनी धनादेशाद्वारे पैसे दिले आणि त्याच वेळी श्री सक्षम यांनी (फंड ट्रान्सफर) निधी वर्ग द्वारे पैसे दिले.

(अ) कोणाचे पैसे जलद पद्धतीने दिले जातात?

(ब) कोणाची पैसे देण्याची पद्धती ही परंपरागत व्यवसायाशी संबंधित आहे?

(क) कोणाची पैसे देण्याची पद्धती ही इ–व्यवसायाशी संबंधित आहे?

(३) रंगाचे उत्पादन करणाऱ्या एका संस्थेने कित्येक वर्षापासून बाजारामध्ये अग्रेसर स्थान पटकाविले आहे. प्रक्रिया न केलेले विषारी स्वरूपाचे टाकाऊ पदार्थ, ते नदी किनाऱ्यावर फेकून देतात, की ज्यामुळे जवळपासच्या खेडेगावांमध्ये अनेक आरोग्य विषयक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

(अ) उत्पादन करणाऱ्या संस्थेने कोणत्या स्वरूपाच्या जबाबदारीकडे दुर्लक्ष केले आहे?

(ब) ते कोणत्या प्रकारचे प्रदूषण करतात?

(क) रंगाचे उत्पादन करणाऱ्या संस्थेने घ्यावयाचा कोणताही एक खबरदारीचा उपाय नमूद करा.

**प्र.४. खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** **[ १२ ]**

(१) रस्ते वाहतूक आणि जल वाहतूक

(२) जीवन विमा आणि अग्नी विमा

(३) संघटन आणि कर्मचारी व्यवस्थापन

(४) जिल्हा आयोग आणि राज्य आयोग

**प्र.५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा ( कोणतेही दोन ) :** **[ ८ ]**

(१) हेन्री फेयॉल यांची 'व्यवस्थापनाची' कोणतीही चार तत्त्वे स्पष्ट करा.

(२) ग्राहकांच्या कोणत्याही चार जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

(३) विपणनाची कोणतीही चार कार्ये स्पष्ट करा.

**प्र.६. खालील विधाने सकारण स्पष्ट करा ( कोणतेही दोन ) :** **[ ८ ]**

(१) संघटन हे संस्थेच्या प्रशासन तसेच व्यावसायिक कार्याला सुलभ करते.

(२) ग्राहक संरक्षणात ग्राहक संघटना आणि अशासकीय संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे.

(३) परंपरागत व्यवसायापेक्षा इ-व्यवसायाची उभारणी करणे सोपे आहे.

(४) समाजाच्या व्यवसायाप्रति अपेक्षा बदलत आहेत.

**प्र.७. खालील प्रश्न सोडवा ( कोणतेही दोन ) :** **[ १० ]**

(१) उद्योजकाची कार्ये स्पष्ट करा.

(२) विपणनाचे ग्राहकांप्रति महत्त्व स्पष्ट करा.

(३) व्यवस्थापनाच्या तत्त्वांचे स्वरूप स्पष्ट करा.

**प्र.८.** **खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा ( कोणतेही <u>एक</u> ) :** **[ ८ ]**

(१) विपणन मिश्रण म्हणजे काय? विपणन मिश्रणाचे ७ पी (7Ps) स्पष्ट करा.

(२) बँक म्हणजे काय? व्यावसायिक बँकांची प्राथमिक कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆